शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष पंधरावे : अंक पंचेचाळीसावा व शेहेचाळीसावा

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२६ (जोडअंक)

राष्ट्रीय चर्चासत्र विशेषांक

# २००० नंतरची मराठी कथा




रयत शिक्षण संस्थेचे

## सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा

दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र व अधिवेशन

२००० नंतरची मराठी कथा

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | 'आयुष्याचे धडे गिरवताना' मधील मानवतावादी मूल्ये | प्राचार्य डॉ.शिवलिंग मेनकुदळे | ०१ |
| २. | २००० नंतरची मराठी कथा आणि विखारी पुरुषी मानसिकता (Manosphere) | डॉ.भरत जाधव | ०७ |
| ३. | आसाराम लोमटे यांची कथा | प्रा.(डॉ.)मांतेश हिरेमठ | १६ |
| ४. | २००० नंतरची गोमंतकीय मराठी कथा : काही निरीक्षणे | डॉ.जयप्रभू कांबळे | १९ |
| ५. | एकविसाव्या शतकातील आदिवासी कथा : स्थिती आणि गती | प्रा.(डॉ.)कृष्णा भवारी | २३ |
| ६. | २००० नंतरच्या मराठी कथेचे वेगळेपण | डॉ.अशोक तवर | २८ |
| ७. | २००० नंतरची स्त्रीलिखीत विज्ञान कथा | प्रा.(डॉ.)विठ्ठल रोटे | ३३ |
| ८. | २००० नंतरची निवडक दीर्घकथा | प्रा.(डॉ.)प्रकाश दुकळे | ३७ |
| ९. | रेड लाइट डायरीज... : सामाजिक व भाषिक अभ्यास | प्रा.(डॉ.)अरुण शिंदे | ४० |
| १०. | प्रज्ञा पवार यांच्या कथेचे आशयलक्ष्यी विवेचन | प्रा.(डॉ.)सर्जेराव पद्माकर | ४५ |
| ११. | २००० नंतरच्या मराठी कथेतील कथनपरता | डॉ.तेजस चव्हाण | ५० |
| १२. | २००० नंतरच्या मराठी कथेची स्थित्यंतरे | डॉ.विजय शिंदे | ५४ |
| १३. | समकालीन भोवतालातील विदीर्ण अनुभवांचा कोलाज : 'दोन शतकांच्या सांध्यावरच्या नोंदी' | डॉ.सागर पाटील | ५७ |
| १४. | सुखदेव नवले यांच्या कथा साहित्याची समाजशास्त्रीय मिमांसा | डॉ.रामदास नाईकनवरे | ६१ |
| १५. | २००० नंतरच्या मराठी आदिवासी कथेतील स्त्री चित्रण | डॉ.कांचन नलावडे | ६४ |
| १६. | आजच्या काळाच्या अवस्थांतराची कथा | प्रा.(डॉ.)एकनाथ आळवेकर | ६८ |
| १७. | २००० नंतरची मराठी कथा: समकालीन प्रवाह आणि स्थित्यंतरे | प्रा.(डॉ.)डी.जे.दमामे | ७० |
| १८. | २००० नंतरचे व्यामिश्र जीवन आणि ग्रामीण कथा | डॉ.गवराम पोटे | ७६ |
| १९. | मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथालेखनाचे स्वरूप | डॉ.प्राजक्ता निकम | ८० |
| २०. | इ.स. २००० नंतरची मराठी कथा : सामाजिक वास्तव, ग्रामीण-नागरी संक्रमण व कथात्मक प्रवृत्ती | प्रा.(डॉ.)एकनाथ पाटील | ८६ |
| २१. | २००० नंतरच्या मराठी ई-कथेतील प्रयोगशीलता | डॉ.विद्या नावडकर | ९३ |
| २२. | नीरजा यांचे २००० नंतरचे कथालेखन : एक आकलन | डॉ.विलास सुर्वे | ९९ |
| २३. | 'परिव्राजक' आणि 'जयंती' या कथासंग्रहातील विविध कलांचे चित्रण | प्रा.(डॉ.) प्रशांत गायकवाड | १०२ |
| २४. | २००० नंतरची मुस्लिम मराठी कथा - जाणिवा आणि वैशिष्ट्ये | प्रा.मोहन चव्हाण | १०५ |
| २५. | एकविसाव्या शतकातील मराठी आदिवासी कथा | डॉ. विनायक राऊत | १०९ |
| २६. | ई-कथा : मराठी कथा लेखनाचा नवीन प्रवाह | डॉ.मनीषा नायकवडी | ११२ |
| २७. | २००० नंतरच्या बोधकथांमधील मानवी मूल्ये | प्रा.(डॉ.)सविता व्हटकर | ११५ |
| २८. | किरण गुरव यांच्या कथा : तंत्रज्ञान प्रभावित नवभांडवली समाजव्यवस्था | डॉ.गुंडोपंत पाटील | ११९ |
| २९. | राजन गवस यांच्या 'रिगणावायली मुंगी' कथासंग्रहातील स्त्री-अस्मितेचा शोध | डॉ.प्रकाश हुलेनवर | १२३ |
| ३०. | लिंगभावाची नावीन्यपूर्ण मांडणी करणारी कथा (मनस्विनी लता रवींद्र यांच्या कथालेखनाच्या अनुषंगाने) | डॉ.वैजयंतीमाला जाधव | १२७ |


ISSN No. 2319-6025

# आजच्या काळाच्या अवस्थांतराची कथा

प्रा.(डॉ.)एकनाथ आळवेकर
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

इ. स. २००० नंतरच्या मराठी साहित्यात विविध प्रवाहांचा समावेश होत असताना सामाजिक स्थित्यंतरे, मानवीजीवन, बदलते कृषिजीवन, आदिवासी जीवन याचा विचार होतो. मराठी साहित्यात भाषांतरित साहित्याचाही समावेश होतो. गाव आणि शहर यांच्यातील अंतर फारच कमी झाल्याने वाढत्या शहरीकरणाचा मानवी जीवनावर झालेला परिणाम अशा अनेक बाबींचे चित्रण इ. स. २००० नंतरच्या साहित्यातून आलेले पाहायला मिळते.

किरण गुरव यांचा महत्त्वाचा असलेला आणि साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त (२०२१) 'बाळूच्या अवस्थांतराची डायरी' हा कथासंग्रह निर्मितीच्या दृष्टीने वेगळा प्रयोग ठरावा असा आहे.'बाळूच्या अवस्थांतराची डायरी', 'इंदुलकर : चरित्र, काळ आणि निर्मिती यांची अन्वेषण कथा', आणि'बाजार : दि मार्केट' या तीनही कथांतून रूपबंधाच्या दृष्टीने वेगळेपणा आढळतो. या तिन्ही कथांचा काळ एकच असून खेडं आणि शहरातील बदलाच्या जाणिवांची नोंद घेणाऱ्या या कथा आहेत. 'बाळूच्या अवस्थांतराची डायरी' ही तुलनेने दीर्घकथा आहे.

'बाळूच्या अवस्थांतराची डायरी' या कथेत खेड्यातून शहराकडे पुढच्या शिक्षणासाठी रुजू होणाऱ्या दहावी पास बाळूची कथा आहे. बाळू हा कथेचा नायक असला तरी त्याचे सर्व कुटुंब कथाभर बाळूसोबत वावरते. त्यामुळे एका अर्थाने ती बाळूच्या कुटुंबाच्या अवस्थांतराची कथा होते. खेड्यातील अत्यंत सामान्य कुटुंबातील बाळू चांगल्या मार्गाने दहावी पास झाल्याचे कौतुक त्याच्या आई-वडिलांना असते. बाळूच्या भविष्याचा विचार करून त्याला पुढच्या शिक्षणासाठी कोल्हापूरला पाठवायचा ते निर्णय घेतात आणि इंजिनिअरिंगच्या शिक्षणासाठी कोल्हापुरातील पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये पाठवतात. बाळूचे वडील गावातील पतसंस्थेत नोकरीला असतात तर आई गृहिणी असते. दोन भावंडं अजून शिकत असतात. कथेतील एकूण कालखंड एक-दीड दिवसाचा असून बाळूला पुढच्या शिक्षणासाठी कोल्हापुरातील होस्टेलवर पोहोचविण्याची तयारी इथपासून बाळूला हॉस्टेलवर पोहोचवून आई-वडिलांसह भावंडं परत गावी परततात इथपर्यंत एवढा कालखंड आहे पण या कालखंडात किरण गुरव यांनी खेडे आणि शहरातील वातावरण अत्यंत बारक्याव्यानिशी उभे केले आहे.

धो धो पावसात डोक्यावर छत्री घेऊन बाळूच्या कुटुंबातील सर्व म्हणजे वडील, आई बनाक्का, भाऊ संदीपा आणि छोटा भाऊ सल्या बाळूला होस्टेलवर पोहोचवायला गावातून निघतात. मध्यमवर्गीय कुटुंबातील बाळूच्या वडिलांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बेताची असल्याने घरातील जुन्या छत्र्या बाळूच्या वडिलांनी घरातच दुरुस्त केल्या. बाळ संदिपाला एस.टी.च्या अर्ध्या तिकिटासाठी हाफ चड्डी घालायला लावून पाचवीला आहे असे कंडक्टरला सांगायला सांगितले. गावातून एसटीने कोल्हापुरात रंकाळा एस.टी. स्टँडवर उतरून तेथून चालत सिटी बससाठी पावसातून भवानी मंडपापर्यंत चालत जातात. पाऊस थांबेपर्यंत वाटेतील'सन्मान' हॉटेलमध्ये चहा घेण्यासाठी जातात पण तिथे कोणी लवकर दखल न घेतल्याने चहा न घेताच बाहेर पडतात आणि रस्त्यावरील टीस्टॉलवाल्याकडे चहा घेतात. जाता जाता बाळूला एखादा नवीन ड्रेस घेण्यासाठी कपड्याच्या दुकानात सर्वजण जातात. बाळूला ड्रेस घेतात पण टी-शर्टसाठी रडणाऱ्या धाकट्या सल्याला आई बनाक्का गोळ्या आणण्यासाठी आठ आणे देते.

भवानी मंडपातील सिटी बसमधून पॉलीटेक्निक कॉलेजजवळ उतरून सर्वजण होस्टेलकडे जातात. होस्टेलचे पैसे आधीच भरलेले असतात. बाळू त्याला दिलेल्या खोलीवर साहित्य ठेवतो. तिथेच बसून सर्वजण घरून आणलेली तांदळाची भाकरी आणि कांद्याची भजी खाऊन न्याहारी करतात. मेसची व्यवस्था होईपर्यंत बाहेरची मेस लावून व्यवस्थित राहण्याची सूचना, अभ्यास करून मेरिटमध्ये येण्याची सूचना देऊन बाळूचे वडील कुटुंबासह गावाकडे निघतात. बाळू रस्त्यापर्यंत त्यांना निरोप द्यायला येतो. खोलीत परत आल्यानंतर गाढ झोपतो. या कथेत बाळूचे झालेले अवस्थांतर, त्याच्यातील बदल किंवा त्याच्याबरोबर त्याच्या कुटुंबातील हे अवस्थांतर खेड्यातून शहराकडे जाण्याचे प्रतीक मानावे लागेल.

कथासंग्रहातील दुसरी कथा 'इंदुलकर : चरित्र काळ आणि निर्मिती यांची अन्वेषण कथा' ही आहे. या कथेत इंदुलकर सरकारी नोकरीत असणाऱ्या गृहस्थाच्या संबंधाने तीन विभागात विभागलेली ही गोष्ट आहे. इंदुलकरांचे सरकारी ऑफिसमधील व्यक्तिमत्व,

इंदुलकरांचे खाजगी घर-कुटुंबातील स्थान आणि वावर तसेच इंदुलकरांना पडणारी स्वप्ने असे हे तीन विभाग आहेत. इंदुलकरांच्या आयुष्यात त्या तिन्ही गोष्टींचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. इंदुलकरांच्या चरित्रातील प्रत्येक दिवस त्या तिन्ही ठिकाणी विभागलेला आहे. सरकारी ऑफिस, घर- कुटुंब आणि जीवनावश्यक झोप या गोष्टींमध्ये इंदुलकरांचा प्रत्येक दिवस ढोबळमानाने आठ आठ तास विभागलेला आहे.

'इंदुलकर : चरित्र, काळ आणि निर्मिती यांची अन्वेषण कथा' या कथेची मांडणी किरण गुरव यांनी प्रयोगात्मक रीतीने केली आहे. असा प्रयोग मराठी कथेत फारसा आढळत नाही. चरित्राचे तीन कप्पे उलगडताना किरण गुरव यांनी अत्यंत सूक्ष्मपणे आणि कलात्मकतेने कथेतील बारकावे मांडले आहेत. सहाय्यक उपअधीक्षक पदावर काम करणाऱ्या इंदुलकरांचे ऑफिस दुसऱ्या मजल्यावर आहे. त्यांच्या हाताखालचे पाटील आणि साळी हे लेखनिक, वरच्या मजल्यावरील बापट-मगदूम साहेब, कामानिमित्त येणाऱ्या? जनतेच्या प्रतिनिधींना'मला समजलेले शासन' समजावणारे इंदुलकर असे काही प्रसंग कथेतून आले आहेत. ऑफिस कथेच्या निमित्ताने इंदुलकरांची खुद्द इंदुलकर आणि दस्तुरखुद्द इंदुलकर अशी दोन रुपे दाखवली आहेत. दस्तुरखुद्द इंदुलकर हे लेखक असतात. दोघात संवाद होत असतात. ऑफिस कथेत सामान्य जनता आणि ऑफिसमधील अधिकारी यांच्यातील संघर्षही पाहायला मिळतो.

घर- कुटुंबातील इंदुलकरांविषयी मांडताना लेखकाने त्याची कुटुंबकथा सांगितली आहे. करवीर काशीतील आयडियल प्लाझा अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या इंदुलकरांना दोन मुले आहेत. शहरातच राहणारे दोन लहान भाऊ, गावाकडे आई-वडील, शेतजमीन असे उल्लेख येतात. ऑफिस सुटल्यानंतर प्रसंगी मुलाला शाळेतून घेऊन येण्याची जबाबदारी इंदुलकरांची असते. अपार्टमेंटच्या दारात आल्यानंतर शेजारच्या अपार्टमेंटमधील सदस्य ड्रेनेजच्या पाण्यावरून आणि उंदरांच्या येण्यावरून वादविवाद करीत असलेले दिसतात. घरी गेल्यावर डी मार्टला जाण्याविषयी पत्नीकडून सांगण्यात येते. डी मार्टहून घरी आल्यानंतर गावाकडे शेतावरून वडिलांचे आणि चुलत्यांचे भांडण झाल्याचे वडिलांकडून फोनवरून समजते. पोलिसांपर्यंत प्रकरण गेल्याने ओळखीच्या पोलिसाला फोन करून लक्ष घालायला सांगतात. उरलेल्या वेळेत मुलांचा अभ्यास, जेवण अशी ही रात्री अकरापर्यंत कुटुंबकथा चालते.

रात्री झोपेत इंदुलकरांना स्वप्ने पडतात. यामध्ये स्वतः इंदुलकर आणि इंदुलकरांच्या अतृप्त इच्छा, भीती, अहंकार, वासना अशा काही गोष्टींची मांडणी केली आहे. इंदुलकरांच्या अबोध मनातील गोष्टी स्वप्नरुपातून मांडल्या आहेत. त्यातून इंदुलकरांचे चरित्र अधिक कळायला मदत होते. इंदुलकरांच्या स्वप्नकथेत ऑफिसमधील इंदुलकर, घरातील इंदुलकर, , लेखक इंदुलकर, गावाकडील चुलत्यांशी असणारे भांडण अशा वास्तव जीवनातील भंग पावलेल्या गोष्टी आलेल्या आहेत. थोडक्यात, 'इंदुलकर : चरित्र, काळ आणि निर्मिती यांची अन्वेषण कथा' या कथेतून जगाचा काळ आणि इंदुलकर यांचे चारित्र्य यांच्यातील संघर्ष लेखक किरण गुरव यांनी मांडताना मानवी वृत्ती-प्रवृत्तींचे दर्शन घडविले आहे.

बाजाराचे सचित्र दर्शन घडविताना हा बाजार केवळ जीवनावश्यक वस्तूंचा नाही तर गुराढोरांचा, शेळ्या मेंढ्यांचा, कोंबड्यांचा बाजार असून बाजारात पालातील दुकान, प्लास्टिक कागदावरील दुकान, विक्रेत्यांच्या अंगावरील दुकान, फिरते दुकान, गारेगारवाले, आईस्क्रीमवाले, सरबतवाले असे सर्व काही आहे. बाजारात एक वेडा मनुष्य विक्रेत्याप्रमाणे आरोळी देत लोकांचे लक्ष वेधत असतो. आणि हातातल्या सुतळीच्या तुकड्याला सोन्याची चेन समजून त्याची किंमत दोनशे कोटी सांगतो. मुंबई शेअर मार्केटमधील धंदा बुडाल्याने त्याच्या डोक्यावर परिणाम झालेला असतो.

किरण गुरव यांनी त्यांच्या लेखन साहित्यातून वेगळ्या धाटणीची मांडणी केल्याचे ध्यानात येते. 'बाळूच्या अवस्थांतराची डायरी' या कथासंग्रहामध्ये एकूण तीन कथा असून'बाळूच्या अवस्थांतराची डायरी' या पहिल्या कथेत खेड्यात राहणाऱ्या बाळूचे शहरातील शिक्षणानिमित्ताने त्याच्या कुटुंबासह कसे अवस्थांतर होते याबद्दलची मांडणी केली आहे. 'इंदुलकर : चरित्र, काळ आणि निर्मिती यांची अन्वेषण कथा' ही कथा प्रयोगात्मक स्वरुपाची आहे. तर'बाजार : दि मार्केट' या कथेत खेड्याच्या आठवडी बाजाराचे अत्यंत सूक्ष्म आणि संवेदनशीलतेने चित्रण केले आहे. किरण गुरव यांच्या या तिन्हीही कथा वेगवेगळ्या संरचनेच्या आणि संहितेच्या आहेत, याची जाणीव होते.

**संदर्भ**

१) गुरव, किरण - बाळूच्या अवस्थांतराची डायरी (कथासंग्रह), शब्द पब्लिकेशन्स, मुंबई, २०१८.
२) '२००० नंतरचे साहित्य प्रवाह : स्वरुप आणि आकलन', संपादक डॉ.मा.कसाब, सिद्धी पब्लिकेशन्स हाऊस, नांदेड, २०२१.